ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.( श्री.राजेश एकनाथ तगरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर खु. तालुका श्रीरामपूर )

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र ९६६६३४३

दिनांक -२६ / ०९/२०२५

संदर्भ- १. या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२३८ /२०२४ दिनांक ०३ /०६ /२०२४ (सेवा निलंबन आदेश)

२.या कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन दिनांक ग्रापं-३/२४१ /२०२४ दिनांक ०३/०६/२०२४

३. मु.का.अ.यांचे पत्र ग्रांप-३/७८८७९३/२०२५ दिनांक १३/०१/२०२५ (पुर्ननिरीक्षण चौकशी अहवालाची तपासणी करणे व आवश्यकता असल्यास सुधारित दोषारोप पत्र तयार करुन सादर करणे बाबत पत्र )

४. गट विकास अधिकारी श्रीरामपूर यांचे आस्था२/१५८/२०२४ दिनांक ०७/०३/२०२४५ (सुधारीत दोषारोप अहवाल)

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-११२२/प्र.क्र.०९/विचौ-२/ दिनांक- २२ एप्रिल २०२५

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.राजेश एकनाथ तगरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर खु.तालुका श्रीरामपूर यांना कार्यालयीन कामकाजात अपहार /गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्रमांक.०२ चे ज्ञापनान्वये श्री.राजेश एकनाथ तगरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर खु.तालुका श्रीरामपूर यांचे गैरवर्तना बाबत एकुण ०९ दोषारोप ठेवून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात येऊन त्या अनुषंगाने त्यांना दोषारोप बजावण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक ०३ अन्वये चौकशी समितीच्या सुधारीत तपासणी अहवालानुसार गट विकास अधिकारी यांचे मार्फत श्री.तगरे यांचे सुधारीत अपहारीत /गैरवर्तनाबाबतचे दोषारोप पत्र प्राप्त झालेले आहेत.

संदर्भ क्रमांक ०४ चे शासन निर्णयानुसार श्री. राजेश एकनाथ तगरे, सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने, त्यांचे सेवानिंलबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंबन प्रकरणी,

श्री.राजेश एकनाथ तगरे यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. प्रकरणी त्यांची खाते निहाय विभागीय चौकशी करणेची कार्यवाही सुरु राहिल.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.राजेश एकनाथ तगरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत बेलापूर खु. तालुका श्रीरामपूर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ---------अहिल्यानगर-येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.राजेश एकनाथ तगरे,सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी,पंचायत समिती श्रीरामपूर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद, श्री. राजेश एकनाथ तगरे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबधीत खाते प्रमुख यांनी ध्यावी .

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक ....२०२५०९१६०६.०११३.... असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:12:03
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.राजेश एकनाथ तगरे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलापूर खु. तालुका श्रीरामपूर . (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती अकोले)

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर /कोपरगाव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती --अहिल्यानगर--

२/- श्री.राजेश एकनाथ तगरे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.